प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# पुस्तके, कविता अन् माणसे हेच 'उद्याचे जगणे'

## संकर्षण कऱ्हाडे : कै. बाळासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमाला

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

उद्याचे तुम्ही जगताना तुमचा आज महत्त्वाचा आहे. हा आज जगताना आहार, विहार व विचार मोलाचे ठरतात. त्याचप्रमाणे कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी पुस्तकांबरोबरच माणसेही वाचायला हवीत. आज वाचलेली पुस्तके, कविता व माणसे हे उद्याचे जगणे होय, असे प्रतिपादन अभिनेते आणि लेखक संकर्षण कऱ्हाडे यांनी केले.



के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १७ वे पुष्प संकर्षण कऱ्हाडे यांनी 'उद्याचे तुम्ही' या विषयावर गुंफले. के. के. वाघ कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिक, के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पिंपळस (रामाचे) आणि के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखक स्वानंद बेदरकर होते. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. बेदरकर यांनी 'ज्याचे वय आहे नूतन, त्याने लिहावे जपून' या कवितेने भाषणाची सुरुवात करत अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, प्रा. के. एस. बंदी, डॉ. एन. एस. पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, ॲड. इंद्रभान रायते, ॲड. ए. के. भोसले, ॲड. एस. ए. सय्यद, सुनील जगताप आदी उपस्थित होते.

डॉ. बी. व्ही. कर्डिले यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ यांच्या जीवनकार्यावर माहितीपट दाखवण्यात आला. डॉ. अंजली बेडसे व स्वाती पवार यांनी परिचय करून दिला. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रशांत शिरोडे यांनी आभार मानले. हर्षद वडजे यांच्या पसायदानाने सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. बी. व्ही. कर्डिले, डॉ. एन. एस. पाटील, प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे व प्राचार्य डॉ. व्ही. जी. भामरे यांनी योगदान दिले.